# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-२५५७२६६ फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


**अतितात्काळ**

क्रमांक :- तंशिस/विकाना/शैवि/ईबीसी/2018/ 2137

दिनांकः- 7 JUN 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व शासकीय,खाजगी विनाअनुदानित व क़ायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर विभाग.

विषयः- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेतर्गत पात्रतेच्या अटीत सुधारणा करणेबाबतच्या शासन निर्णयातील अटीबाबत.

संदर्भः- 1.उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णयःटीईएम-2016/प्र.क्र.559/तांशि-4,दि. 21 जुन,2017

2.उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्र क्र. :संकीर्ण-2018/प्र.क्र.193/तांशि-4, दि. 09/05/2018

3.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई,यांचेकार्यालयांचे पत्र क्र.18/तंशिसं/ईबीसी/वि.का./2018/ 203, दि.25/05/2018

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते कि, संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता" या योजनाचा लाभ मर्यादित ठेवण्यासाठी सदर योजनांचा लाभ शैक्षणिक वर्ष 2017-18 पासुन कुंटुबांतील दोन अपत्यापर्यंत राहील, अशी अट परिच्छेद क्र. 5 मध्ये नमुद केलेली आहे. **परंतु संदर्भिय पत्र क्र. 2 च्या अनुषंगाने सदर योजनांचा लाभ हा आर्थिकदृष्या दुर्बल कुंटुबांतील अपत्य संख्येचा विचार न करता कुंटुबांतील कोणत्याही दोन पात्र अपत्यांना देण्यात यांवा, असे निर्देश दिलेले आहेत.**(सोबत संदर्भिय पत्र क्र.2 शासन पत्राची प्रत जोडण्यांत येत आहे)

संदर्भिय पत्र क्र. 3 च्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते कि,शैक्षणिक वर्ष 2017-18 पासुन सदर योजनांचा लाभ घेणां-या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज तिस-या अपत्यामुळे या विभागीय कार्यालयांमार्फत ऑनलाईन रिजेक्ट करण्यांत आलेले आहे, अशा विद्यार्थ्यांच्या कुंटुबांतील लाभार्थी विद्यार्थी व्यतीरिक्त अन्य दोन अपत्यांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला अथवा नाही, असे प्रमाणपत्र शिक्षण घेतलेल्या संबंधित महाविद्यालयांकडुन प्राप्त करुन संस्थांस्तरावर तिस-या अपत्याच्या कारणास्तव प्रलंबित असलेल्या त्रुटीची पुर्तता करुन अर्ज या कार्यालयास सादर करावे. जेणे करुन लाभार्थी विद्यार्थांचे अर्जास ऑनलाईन मान्यता प्रदान करणे शक्य होईल. यांची दक्षता संबंधित संस्था प्रमुखानी घ्यावी.

सहपत्रः-वरीलप्रमाणे

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपुर

प्रतः- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई,यांना माहिती करिता सविनय सादर

E/SAPNA KOWE/OFFICE LETTER/INSTT. 2017-18

महाराष्ट्र शासन

संकीर्ण-२०१८/प्र.क्र. १९३/तांशि-४,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
खो.क्र.४४१, चौथा मजला,
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई : ४०० ०३२
दूरध्वनी क्र. ०२२ -२२०४ ०९३५
दिनांक : ९ मे, २०१८.

पत्र प्राप्त झाले
11 MAY 2018
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्रतेच्या अटीत सुधारणा करणेबाबतच्या शासन निर्णयातील अटीबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र. का.क्र. १८/तंशिसं/शा.पत्र/(DBT)/२०१८/१२४, दिनांक ३१/०३/२०१८

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक २१ जून, २०१७ मध्ये "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व " डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना " या योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहील, अशी अट नमूद करण्यात आली आहे. या अटीचा अर्थ हा " सदर योजनेंचा लाभ दोनपेक्षा जास्त अपत्य संख्या असलेल्या कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही दोन अपत्यांना मर्यादित राहील ", अशी आपली धारणा असल्याची आपण उपरोक्त संदर्भाधीन पत्रात नमूद केले आहे.

३. उपरोक्त शासन निर्णयामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अपत्य संख्येचा विचार न करता कुटुंबातील कोणत्याही दोन अपत्यांपर्यंत "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व " डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना " या योजनेंचा लाभ मर्यादित ठेवण्यासाठी सदर योजनेंचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहील, अशी अट नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे " सदर योजनांचा लाभ दोनपेक्षा जास्त अपत्य संख्या असलेल्या कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही दोन अपत्यांना मर्यादित राहील ", याबाबत असलेली आपली धारणा पक्की करण्यात येत आहे. त्यानुसार सदर योजनांचा लाभ हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अपत्य संख्येचा विचार न करता कुटुंबातील कोणत्याही दोन पात्र अपत्यांना देण्यात यावा.

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. 211. 1307
दिनांक . . 14.5.18 .
कार्यासन क्र. . . 15 . . .

D-15

( म. मा. मोरवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

F:\Sujata\letters 2018\DTE अभिप्राय.docx